## नियमीत दिवाणी दावा क्र.२७६/२०१९ मधील निशाणी क्र.२९ वरील आदेश

( CNR : MHAH250007302019 )

सदरचा अर्ज प्रतिवादी नं.२ ते ११ यांनी त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन मिळणेचा आदेश होणेकामी दाखल केला आहे. सदर अर्जाचे पुष्ठ्यर्थ प्रतिवादी नं.३ दादाभाऊ हुलावळे यांनी निशाणी क्र.३० वर प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे.

२. सदर प्रतिवादींचे असे कथन आहे की, सदर दाव्याचे कामी सदर प्रतिवादींकडून कैफियत देण्यास उशीर झाला असून सदरचे प्रतिवादी हे आजरोजी कैफियत दाखल करत आहेत. सबब, प्रस्तुत अर्जाद्वारे सदर प्रतिवादींनी त्यांना दाव्याचे कामी कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ होऊन त्यांनी अर्जासोबत दिलेली कैफियत दाखल करुन घेण्यास विनंती केली आहे.

३. वादींनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दिलेले आहे. वादींचे असे कथन आहे की, प्रतिवादींचा अर्ज खरा नाही. प्रतिवादींतर्फे सदर अर्जामध्ये कैफियत दाखल करणेस का उशीर झाला याचे कारण नमुद केलेले नाही. अर्जामधील कथने ही काल्पनिक व खोटी आहेत. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अन्यथा सदर प्रतिवादींचे विरोधात हेवी कॉस्टचा हुकूम करणेत यावा.

४. वादींचे वकीलांचा व प्रतिवादी नं.२ ते ११ यांचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

५. वादींनी सदरचा दावा प्रतिवादींच्या विरोधात वाटप व जाहीर ठरावासाठी दाखल केलेला आहे. दाव्यातील कथनाचे अवलोकन करता असे दिसून येते की, सदर दाव्यामध्ये पक्षकारांचे शेतजमीनींमधील मौल्यवान अधिकार समाविष्ट आहेत. सदर प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जासोबत कैफियत दाखल केलेली आहे. सदर प्रतिवादींची कैफियत दाखल करुन न घेतल्यास त्यांचे अतोनात नुकसान होईल. प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. ही बाब नमुद करावीशी वाटते की प्रतिवादींना दाव्याचे समन्सची बजावणी एप्रिल २०१९ मध्ये झाल्याचे दिसते परंतु सदर प्रतिवादी हे दाव्याचे कामी जुलै २०१९ मध्ये हजर झाल्याचे दिसते. प्रतिवादींनी विलंबासाठी कोणतेही संयुक्तिक कारण अर्जामध्ये नमुद केलेले नाही. तरीदेखील माझ्यामते दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यासाठी सदर प्रतिवादींनी दाखल केलेली कैफियत

अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. प्रतिवादींना कैफियत दाखल करण्यास विलंब झाल्यामुळे वादींना झालेल्या त्रासाबद्दल व गैरसोयीबद्दल नुकसानभरपाई देता येईल. सबब, नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज (निशाणी क्र.२९) मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी नं.२ ते ११ यांचेविरुध्द कैफियत दाखल करणेस झालेला विलंब त्यांनी प्रत्येकी रक्कम रु.३००/- वादींना देण्याच्या अटीवर माफ करण्यात येत आहे.

Mayura Vamanrao Nimbalkar
Digitally signed by Mayura Vamanrao Nimbalkar
Date: 2021.11.29 18:07:50 +0530

**( मयुरा व्ही. निंबाळकर )**
**दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**पारनेर**

**दि.२९.११.२०२१**
**पारनेर**